सकाळ
पुणे, मंगळवार
१५ नोव्हेंबर २०१६
३

असल्यास योग्य प्रकारचे लोशन
तेलकट त्वचेसाठी थोडेच लोशन

**ॲडमिशन अपडेट**

# सन २०१७ मधील प्रवेशातील बदल

**हेमचंद्र शिंदे**, बारामती

जेईई मेन २०१७ : या शैक्षणिक वर्षातील एनआयटी, एनआयईटीसह देशभरातील नामांकित संस्थांमधील सुमारे ५० हजार जागांवरील प्रवेशासाठी सीबीएसई बोर्डाच्या वतीने घेतली जाणारी जेईई मेन-२०१७ परीक्षा २ एप्रिल २०१७ रोजी होणार आहे. या परीक्षेचे अर्ज नोव्हेंबर-डिसेंबर २०१६ मध्ये उपलब्ध होणार आहेत.

**पात्रता :** सन २०१६ पर्यंत प्रवेशासाठी जेईई मेन व बारावीमधील गुणांच्या पर्सेंटाईलला ६०:४० असे भारांकन देऊन त्यानुसार ऑल इंडिया मेरिट क्रमांकाचे वाटप होऊन प्रवेशप्रक्रिया राबविली जात होती. मात्र सन २०१७ मध्ये ऑल इंडिया मेरीट फक्त जेईई मेन २०१७ परीक्षेतील गुणांच्याच आधारे दिले जाणार आहेत. त्यामुळे बारावीसाठी कोणतेही भारांकन राहणार नाही. संबंधित संस्थांमध्ये प्रवेशासाठी मात्र बारावीत कमीत कमी ७५ टक्के गुणांची (राखीव प्रवर्गासाठी ६५ टक्के) किंवा बोर्डाच्या परीक्षेत टॉप २० पर्सेंटाईलमध्ये स्थान मिळविणे बंधनकारक आहे. थोडक्यात, बारावीच्या गुणांना भारांकन नसले, तरीही बारावीचे महत्त्व काही कमी झालेले नाही, हे विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावे. सन २०१६ पर्यंत वरील संस्थांमधील बीई, बीटेक प्रवेशासाठी बारावीमध्ये ४५ टक्के (राखीव प्रवर्ग ४० टक्के) अशी अट होती.

## आयआयटी प्रवेश

आयआयटीच्या २२ संस्थांमधील सुमारे १० हजार ६०० जागांसाठी प्रवेश मिळविणे, हे स्वप्न असले तरी यंदा या प्रवेशासाठी जेईई- मेन-२०१७ परीक्षा द्यावी लागणार आहे. या परीक्षेच्या निकालानंतर गुणानुक्रमांकानुसार प्रथम येणाऱ्या २ लाख २० हजार विद्यार्थ्यांना जेईई-ॲडव्हान्स २०१७ साठी पात्र ठरविले जाणार आहे. मागील वर्षीपर्यंत दोन लाख विद्यार्थ्यांची निवड केली जात होती. सन २०१७ मध्ये यात २० हजार अधिक विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होणार आहे.

**जेईई ॲडव्हान्स २०१७ :** देशपातळीवर घेतल्या जाणाऱ्या या परीक्षेचे दोन्ही पेपर २१ मे २०१७ रोजी होणार आहेत. जेईई मेन २०१७ परीक्षा (ऑफलाइन) २ एप्रिल २०१७ रोजी व त्यानंतर २८ एप्रिल ते २ मे २०१७ या कालावधीत ऑनलाइन रजिस्ट्रेशन करावे लागणार आहे. निकाल ११ जून २०१७ रोजी जाहीर होईल. प्रवेशासाठी बारावीचे भारांकन नसले तरीही ७५ टक्के गुणांची अट मात्र यातही कायम आहे.

## आरोग्य विज्ञान शाखेतील प्रवेश

**एमबीबीएस व बीडीएस :** राज्यातील सर्व शासकीय, खासगी, अभिमत विद्यापीठांमधील प्रवेश हे राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या नीट -२०१७ परीक्षेतील गुणांच्या आधारेच होणार आहेत. देशातील कोणत्याही खासगी संस्था, अभिमत विद्यापीठे यांना स्वतंत्रपणे परीक्षा घेता येणार नाही. प्रवेशप्रक्रिया मात्र १५ टक्के ऑल इंडिया कोट्यासाठी मेडिकल कौन्सिलिंग कमिटी;तर ८५ टक्के प्रवेश राज्यातील कोट्यासाठी राज्य सरकार राबवेल.

**बीएएमएस व उर्वरित शाखा :** बीएएमएस, बीएचएमएससह उर्वरित शाखांच्या प्रवेशासाठी राज्य सरकार स्वतंत्रपणे एमएच- सीईटी २०१७ घेणार की, सन २०१३ प्रमाणे नीट परीक्षेच्या गुणांद्वारे प्रवेश देणार, हे अद्याप मागणी करूनही जाहीर केलेले नाही. संबंधित ७ शाखांमधील सुमारे ८ हजार जागांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी सध्यातरी गोंधळातच आहेत.

## अत्यंत महत्त्वाचे

सन २०१६-१७ पासून प्रवेश घेतलेल्या; तसेच सध्या शिकत असलेल्या सर्वांसाठी 'ईबीसी'मधून शिक्षण शुल्कात ५० टक्के सवलत मिळणार आहे. आपला प्रवेश निश्चित झाला असला, तरी आपण सुधारित मापदंडामध्ये बसत असल्यास त्वरित उत्पन्नाचा दाखला- आर्थिक मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र संबंधित तहसील कार्यालयातून मिळवावे.

(**शब्दांकन : ज्ञानेश्वर रायते**, बारामती)